# जिल्हा परिषद, चंद्रपूर

## समाज कल्याण विभागा मार्फत राबविण्यांत येण—या विविध विकासात्मक योजनांची माहिती पुस्तीका

# सन 2007—2008

**समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर**

**राबविण्यात येणाऱ्या विविध विकासात्मक योजना**

**शासकिय योजना :-**

**1) आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य :-**

**उद्देश :-** समाजातील जातीय भेदभाव अस्पृष्यता निवारण करणे.

**लाभार्थी निकष** :- विवाहीत जोडप्यांपैकी एक व्यक्ती अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती यापैकी असावा व दुसरा व्यक्ती संवर्ण हिंदू, जैन, लिंगायत, शिख धर्मीय असावा. (मुस्लीम व ख्रिश्चन धर्म सोडून तसेच आंतरप्रवर्ग विवाह झाला असेल तरीही सुध्दा या योजनेचा लाभ घेता येतो जसे विजाभज,अनु.जाती,अनु.जमाती यांचे आंतरप्रवर्ग विवाह झाला असेल तर.

**लाभाचे स्वरूप :-**
1) रु. 7,500/- राष्ट्रीय बचतपत्र
2) रु. 7,000/- नगदी धनाकर्ष स्वरूपात.
3) रु. 400/- गृहोपयोगी भांडी
4) रु. 100/- सत्कार खर्च

एकुण :- रु.15,000/-

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यात लाभार्थ्याने आवश्यक कागदपत्रासह समाज कल्याण अधिकारी (गट-अ) ,जि.प.चंद्रपुर यांचेकडे अर्ज करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -**

1) विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
2) वर-वधु यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
2) वर अथवा वधु जे मागासवर्गीय असतील त्याबाबतचे संबंधित उपविभागिय अधिकारी/दंडाधिकारी यांनी दिलेल्या जातीचा दाखला व इतर मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला देणे आवश्यक आहे.अनु.जाती/अनु.जमाती/विजाभज आंतरप्रवर्ग विवाह झाला असल्यास दोघांचे दाखले जोडणे आवश्यक आहे.
3) वधु/वराचे एकत्रित फोटो ( पासपोर्ट साईज)
4) वधु/वराचे प्रत्येकी दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारसपत्रे ( वर्तणुकिबाबत)
5) महाराष्ट्राचे रहिवासी असल्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचा दाखला ( अधिवास प्रमाणपत्र) वर-वधु यांचे.
6) 100 रू. स्टॅम्पपेपर वर ॲफिडेव्हीट ( दोघांचेही )

## 2) <u>वृध्द कलाकारांना मानधन देणे :-</u>

**उद्देश** :- समाजातील अनिष्ट प्रथा निर्मुलनाच्या दृष्टीने लोक कलेतून जनजागृती करुन समाज सुधारणा करणाऱ्या वृध्द कलाकारांना प्रोत्साहन देणे..

**लाभार्थी निकषः-**

1. साहित्य व कलेच्या क्षेत्रात मोलाची भर घालणारी व्यक्ती. उदा.अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, वाईट प्रथा व कालबाह्य चालीरिती यावर किर्तन, भजन, लोकनाट्य, कलापथक, साहित्य इत्यादी
2. सांस्कृतीक कला आणि वाङःमय क्षेत्रात ज्यांनी प्रदीर्घ महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहे अशी व्यक्ती.
3. वृध्द कलाकाराचे वय 50 वर्ष पेक्षा जास्त असावे.
4. जे कलाकार व साहित्यीक अत्यंत आजारी आहे. जसे अर्धांगवायु, क्षय, कर्क रोग, कृष्ठ रोग किंवा शारिरीक व्यंग असल्याने ते स्वतःचा व्यवसाय करु शकत नाही, अशा व्यक्तीस वयाची अट नाही.

**लाभाचे स्वरूप - खालील प्रमाणे मानधल दिले जाते.**

- गट "अ" - रु. 8,500/- वार्षीक
- गट "ब" - रु. 7,200/- वार्षीक
- गट "क" - रु. 6,000/- वार्षीक

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यात अर्ज पात्र कलावंताने समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चदंपूर यांचेकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -**

1. सक्षम अधिकारी यांचे उत्पन्नाचा दाखला ( रू. 24000/ चे आत)
2. वयाचा दाखला .
3. साहित्य व कलेच्या क्षेत्रातील अनुभवाचे प्रमाणपत्रे
4. विहित अर्जासोबत पासपोर्ट साईजचे अलिकडे काढलेला साक्षांकित केलेला फोटो जोडावा.

## 3) दलित वस्ती सुधार योजना :-

**उद्देश :-** ग्रामिण भागातील अनु.जातीचे लोकांचे वस्तीची सुधारणा करणे, या योजनेतर्गत दलित वस्तीमध्ये रस्ते बांधकाम, नाली बांधकाम, समाज मंदिर विजेच्या दिव्याची सोय,शौचालय, पिण्याचे पाण्याच्या सोयी इत्यादी करीता शासन अनुदान देते.

**निकष व अनुदान** :- ज्या गावांतील दलित वस्तीची लोकसंख्या 50 ते 100 आहे त्यांना 2.00 लाखा पर्यन्त, 101 ते 150 पर्यन्त लोकसंख्या 3.00 लाखा पर्यन्त, 150 चे वर लोक संख्या असलेल्या गावांना 5.00 लाखा पर्यन्त अनुदान मिळते. मात्र एका कामावर 2.00 लाखापेक्षा जास्त खर्च करता येत नाही, परंतू पिण्याचे पाण्याचे सुविधेसाठी ही मर्यादा लागु नाही.

**अर्ज करण्याची पध्दत** - विहित नमुन्यात अर्ज पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायतीने सादर करावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-** (1) नमुण्यातील विवरणपत्र, (2) ग्रा.पं. चा ठराव व ग्रामसभा ठरावात ज्या कामाकरीता मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा अंदाजपत्रकानुसार होणारा जास्तीचा खर्च ग्राम पंचायत खर्च करण्यास तयार असल्याचे नमुद करणे आवश्यक आहे, (3) ग्रा.पं.मालकी बाबत 7/12 चा उतारा अथवा प्रमाणपत्र, (4) जागेचा नकाशा उपअभियंता यांनी प्रमाणीत केलेला. (5) कामाचे अंदाजपत्रक, (6) यापुर्वी अनुदान घेतले नसल्याबाबतचा ग्रा.पं.दाखला.

वरील प्रमाणे प्रस्ताव 4 प्रतित संबंधीत संवर्ग विकास अधिकाऱ्यामार्फत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

**4) स्वयंसेवी संस्थांद्वारा चालविण्यांत येणाऱ्या मागासवर्गीयांच्या वसतीगृहांना अनुदान देणे:-**
**उद्देश :-** इयत्ता 5 वी च्या पुढिल मागासवर्गीय गरीब व होतकरु विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे सोई सोबतच राहण्याची व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था होणे.

**प्रवेशाचे निकष :-** वसतीगृहात प्रवेशासाठी खालील प्रमाणे विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे.

a. अनु.जाती 75% टक्के
b. अनु.जमाती 10%
c. वि.मा.प्र. 2%
d. वि.जा.भ.ज. 10%
e. अंध अपंग 3%

एकुण 100 टक्के यांच्या 20 टक्के विदयार्थी संख्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीयांकरीता वेगळी राखिव ठेवण्यांत येते.

**लाभाचे स्वरूप** - विदयार्थ्यांना निवासाची व भोजनाची मोफत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाते. या करीता शासनाकडून प्रती विदयार्थी 500/- रू. प्रतिमाह अनुदान संस्थेला देय आहे. जिल्हायात एकुण 63 अनुदानित वसतीगृह आहेत. त्यापैकी 43 मुलांची व 20 मुलींची वसतीगृहे आहेत. तेथे विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची विनामुल्य व्यवस्था केल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** - पात्र विदयार्थ्याने अर्ज सबंधित वसतीगृहाचे अधिक्षक यांचेकडे सादर करावा.

**अर्जासाबत जोडण्याची कागदपत्रे** -

1. मागील वर्षीची परिक्षा उतीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिका.
2. सक्षम अधिका-याने दिलेले मागील वर्षीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
3. सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला.

विद्यार्थ्यांनी संबंधीत वसतीगृहात प्रवेश घ्यावयाचा झाल्यास शाळा सत्र सुरु होण्यापुर्वी आवेदन पत्र संबंधीत वसतीगृह अधिक्षकाकडे द्यावे.

**5) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण / परिक्षा फी देणे :-**
**(अनु.जाती,जमाती,विजाभज व विमाप्र):-**

**उद्देश :-** मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने विद्यार्थी शिक्षणा पासुन वंचित राहू नये,

**लाभार्थी निकष -** याकरीता सर्व क्षेत्रातील विद्यार्थ्यांची शिक्षण फी, परिक्षा फी व प्रवेश फी शासनाकडून भरल्या जाते. ( विदयार्थी अनु.जाती,जमाती,विजाभज व विमाप्र असावा )

**लाभाचे स्वरूप** :- शिक्षण फी - रु. 12, प्रवेश फी - रु.6.00 व एस.एस.सी.परिक्षा फी रु. 225 पर्यत प्रति विद्यार्थी अनुदान दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** :- विद्यार्थ्यांचा प्रस्ताव शाळेच्या मुख्याध्यापकांनी गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फतीने विहित मुदतीत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडेपाठवावा. ( मुदत 31 ऑगष्ट)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -**

1 . नमुना ई परिक्षा फी करीता.
2. नमुना ए व बी शिक्षण सत्र फी करीता.

**6) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक शिष्यवृत्ती देणे :-**

**उद्देश :-** वर्ग 5 ते 10 मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणुन ही शिष्यवृत्ती देण्यात येते,

**लाभार्थी निकष** -1) विदयार्थी वर्ग 5 ते 10 मध्ये शिकत असणारा असावा.2)प्रत्येक वर्गातून 2 विद्यार्थी 50% पेक्षा जास्त गुण मिळवुन प्रथम / द्वितीय क्रमांकाने उतीर्ण होणा-या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्यांत येते.

**अनुदानाचे स्वरूप :-** वर्ग 5 ते 7 पर्यन्त रु. 200/-, वर्ग 8 ते 10 - रु. 1000/-वार्षिक रोख देण्यांत येते.

**अर्ज करण्याची पध्दत** :- विद्यार्थ्यांचा प्रस्ताव विहित प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापकांनी गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फतीने विहित मुदतीत मुदत 31 ऑगष्ट पर्यत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा.

**7) वर्ग 5 ते 7 मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ( अनु.जाती , विजाभज, व विमाप्र)**

**उद्देश :-** वर्ग 5 ते 7 मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनींची शाळेत मुलींची गळती थांबावी म्हणुन शिष्यवृत्ती देण्यात येते

**लाभार्थी निकष -** 1) विदयार्थीनी अनु.जाती , विजाभज, व विमाप्र या प्रवर्गाची असावी 2) या शिष्यवृत्तीसाठी मागा.मुलींना उत्पन्नाची किंवा गुणाची अट राहणार नाही.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप :-** प्रत्येक विद्यार्थीनींना दरमहा रु.60/- 10 महिन्याकरीता शिष्यवृत्ती दिली जाते व पुर्ण सत्राचे रु. 600/-. दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत :-** प्रस्ताव शाळेच्या मुख्याध्यापकांनी विहित प्रपत्रात गट शिक्षणाअधिसकारी यांचे मार्फतीने विहित मुदतीत मुदत 31 ऑगष्ट पर्यंत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेडे सादर करावा.

## 8) इयता 8 वी 10 वी मध्ये शिकणा-या विदयार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना (अनु.जाती) :-

**उद्देश :-** शाळेमध्ये मुलींचे गळतीचे प्रमाणे कमी व्हावे व नियमीत उपस्थिती असावी.

**निकष** - वर्ग 8 ते 10 मध्ये शिकत असलेल्या अनु.जातीच्या मुलींना शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय मुर्लींना उत्पन्नाची किंवा गुणाची अट राहणार नाही.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप** :- प्रत्येक विद्यार्थीनींना दरमहा रु. 100/- शिष्यवृत्ती व पुर्ण सत्रात रु.1,000/- शिष्यवृत्ती दिली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** :- प्रस्ताव शाळेच्या मुख्याध्यापकांनी विहित प्रपत्रात गट शिक्षणाअधिसकारी यांचे मार्फतीने विहित मुदतीत मुदत 31 ऑगष्ट पर्यंत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेडे सादर करावा.

## 9) औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील प्रशिक्षणार्थीना विद्यावेतन :-

**उद्देश :-** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन व्यवसायाकडे वळविण्या करीता

**लाभार्थी निकष** -औद्योगिक शिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिल्या जाते.

**विद्यावेतन** :-निवासी अनुसुचित जातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा 40 टक्के संचालक ,तांत्रिक शिक्षण यांचेकडून व अनिवासी विदयार्थ्यांना संचालक ,तांत्रिक शिक्षण यांचेकडून दरमहा रू. 40 व समाज कल्याण विभागाकडून दरमहा रू. 20 असे एकुण रू. 60 दरमहा विदयावेतन देण्यांत येते.व 60 टक्के समाज कल्याण विभागा कडून असे एकुण रू. 100 मंजूर करण्यांत येते.

**अर्ज्र करण्याची पध्दत :-** जिल्ह्यातील कार्यरत 13 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रानी प्रस्ताव प्रस्ताव विहित प्रपत्रात विहित मुदतीत मुदत 31 सप्टेबर पर्यंत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. (तदनंतर विदयावेतन औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थ्यांना वितरण करण्यांत येते.)

## 10)अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती :-

**उद्देश :-** अस्वच्छ काम करणा-या पाल्यांना मॅट्रिकपुर्व शिक्षण घेता यावे .

**लाभार्थी निकष** - मुलांचे पालक अस्वच्छ व्यवसाय, जसे - कातडी सोलणे, कातडी कमावणे व मैला वाहून नेणे हे व्यवसाय करणारे असावे.

**लाभाचे स्वरूप :-**

वर्ग 1 ते 5 - द.म.रु.40/- व तदर्थ वार्षिक अनुदान रु.550/- एकुण रु.950/-
वर्ग 6 ते 8 - द.म.रु.60/- व तदर्थ वार्षिक अनुदान रु.550/- एकुण रु.1,150/-
वर्ग 9 ते 10 - द.म.रु.75/- व तदर्थ वार्षिक अनुदान रु.550/- एकुण रु.1,300/-

**अर्ज करण्याची पध्दत :-** संबंधीत शाळेने गट शिक्षणाधिकारी पं.स. मार्फत सादर करावेत, सदर प्रस्ताव 31 ऑगष्ट पुर्वी समाज कल्याण अधिकारी (गट-अ), जि.प. चंद्रपूर यांना सादर करावेत.

**अर्जासोबत खालील सोबत कागदपत्रे :-** (1) आवेदनपत्र, (2) गुणपत्रिकेची सत्यप्रत, (3) रु.20/- चे कोर्ट स्टॅम्पवर तहसिलदारांचे सहीचे शपथपत्र, (4) जातीचे प्रमाणपत्र, (5) रहीवासी दाखला, (6) व्यवसाय प्रमाणपत्र (सरपंच).

**11)मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य :-**

**उद्देश :-** मागासवर्गीय समाजाच्या लोकांना सहकारी माध्यमातून निवारा उपलब्ध करुन देणे, हा मुख्य उद्देश आहे.

**निकष :-** 1) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अनु.जाती, अनु.जमाती, व्यक्तींच्या पंजीबध्द सहकारी गृहनिर्माण संस्था या योजनेस पात्र असतील. **:-** 2) आर्थिक दुर्बल गट रु.25000/- पर्यन्त वार्षीक, 3) अल्प उत्पन्न गट रु.25001/- ते 50000/- वार्षीक, 4) मध्यम उत्पन्न गट रु. 50001/- ते 75000/- वार्षीक, 5) मध्यम उच्च उत्पन्न गट रु.75001/- ते 95000/- वार्षीक

**लाभाचे स्वरूप :-** 30% बांधकाम अनुदान व 20% व्यक्तीगत वर्गणी याप्रमाणे अनुदान देय राहील. मध्यम उत्पन गट व उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना 30% बांधकाम अनुदान मिळणार नाही.
संस्थेने 20% व्यक्तीगत वर्गणी व वित्तीय संस्थेकडून 50% कर्जाची रक्कम प्राप्त करुन बांधकाम प्रक्रीया सुरु केल्या नंतर टप्प्या टप्प्याने 30% रक्कम अनुदान संस्थेला देण्यात येईल.

**जमीन :-** मा.व.गृह निर्माण संस्थेला शासकीय जमीन उपलब्ध नसेल तर जिल्हाधिकारी मार्फत जमीन उपलब्ध करुन दिल्या जाईल. संसथेला जमीन विकत घ्यावयाची असेल किंवा विकत घेतली असेल, तर रचनाकार विभाग ठरविल ती किंवा प्रत्यक्ष खरेदी किंमत यातील कमी रक्कम अर्थसहाय्य म्हणुन दिल्या जाईल.

**अर्ज करण्याची पध्दत** - पंजिबध्द संस्थेने विहित प्रपत्रात अर्ज समाज कल्याण अधिकारी ( गट-अ जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा.( अर्ज समाज कल्याण विभाग, जि.प.चंद्रपुर यांचेकेडे उपलब्ध आहे)

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

1. सर्व सभासदाचे जातीचे प्रमापणत्र.
2. सर्व सभासदाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र
3. जमीन उपलब्ध बाबत सात/बारा.
4. करारनामा
5. बँक बॅलंन्स प्रमाणपत्र
6. संस्थेच्या ठरावाची प्रत.

**12) व्यसनमुक्ती प्रचार कार्य व प्रसिध्दी :-**

**उद्देश :-** समाजातील व्यसनाधिन व्यक्तींना व्यसनापासुन मुक्त करण्याकरीता व समाज जागृती करण्याकरीता प्रचार करणे.

1. 26 जुन अंमली पदार्थ सेवन विरोधी दिन साजरा केल्या जातो.
2. 2 आक्टोंबर ते 8 आक्टोंबर व्यसनमुक्ती सप्ताह कार्यक्रम आयोजीत केल्या जातो.

**13)अपंगांच्या निवासी विशेष शाळांना अनुदान देणे :-**

**उद्देश :-** अपंगांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी शासनमान्य व पंजीबध्द संस्था मार्फत निवासी शाळा अनुदान देणे. व भोजन व निवासाची विनामुल्य सुविधा करणे.

**विदयार्थी निकष-** . 1 )अंध, मुकबधिर, अस्थीव्यंग, बहूविकलांग, मतिमंद इत्यादी विदयार्थी प्रवेशास पात्र 2) अपंगत्व 60 टक्केचे वर असावे व तो 6 ते 18 वर्ष वयोगटातील असावा.

**लाभाचे स्वरूप** - विदयार्थ्यांची जेवणाची व निवासाची मोफत व्यवस्था केली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत -** अंध, मुकबधिर, अस्थीव्यंग, बहूविकलांग, मतिमंद 60 टक्के वर अपंगत्व असलेल्या विदयार्थ्याने संबंधित संस्थेशी संपर्क करावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे-**

1. 60 टक्के वरील अपंगत्वाचे प्रमाणपत्र.
2. शैक्षणिक गुण प्रमाणपत्र
3. वयाचा पुरावा.

वेगवेगळ्या शाळा व कर्मशाळा कार्यरत असुन जिल्हयात एकुण 11 मान्यमाप्राप्त व अनुदानित निवासी शाळा/कर्मशाळा पुढिल प्रमाणे आहेत.1) आंनद मुकबधिकर विदयालय आनंदवन 2) मुकबधिर निवासी विदयालय चंद्रपुर 3) मुकबधिर निवासी विदयालय मुल 4) संत तुकडोजी निवासी विदयालय चिमुर 5) दूर्गाताई मुकबधिर निवासी विदयालय गोंडपिपरी 6) आनंद अंध विदयालय आनंदवन 7) प्रेरणा अंध विदयालय घोडपेठ 8) संधिनिकेतन अपंगाची कर्मशाळा आनंदवन 9) निवासी अपंग विदयालय ब्रम्हपुरी 10) अस्थीव्यंग निवासी विदयालय मुल 11) स्किकार दुर्बल मनस्क मुलांची शाळा धिरजग्राम ,ताडाळी.

**14)अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :-**

**उद्देश :-** अपंगांनी स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतिशील घटक म्हणुन जगता यावे यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता प्राप्त करुन घेण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

**लाभार्थी निकष - <u>शालांतपुर्व शिष्यवृत्ती</u>** विदयार्थी वर्ग 1 ते 10 व्या वर्गात शिक्षण घेणारा असावा. व तो अपंग असावा. तसेच तो 40 टक्के अपंग असावा. तसेच मागील वर्षिचे गुण 40 टक्के चे वर असावे.
**शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती** -विदयार्थी गट -अ पदवी, गट ब पदविका, गट क प्रमाणत्र अभ्यासक्रम , गट-ड सर्वसाधारण पदवी पर्यंत अभ्यासक्रम व गट-ई 10+2 असावा तसेच तो 40 टक्के अपंग असावा. तसेच मागील वर्षिचे गुण 40 टक्के चे वर असावे.

**लाभाचे स्वरूप :-**

1) <u>शालांतपूर्व मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती -</u>

1. 1 ते 4 - द.म. रु. 50/-
2. कर्णबधिर पायरी 4 था - द.म. रु. 50/-
3. नोंदणी प्रमाणपत्र विशेष शाळांसाठी 18 वर्षापर्यन्त विद्यार्थी - द.म. रु. 75/-
4. 5 वी ते 7 वी - द.म. रु. 75/-
5. 8 वी ते 10 वी - द.म. रु.100/-

2) <u>शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिष्यवृत्ती :-</u>

| | अनिवासी विदयार्थ्याकरीता | वसतीगृहाची विदयार्थ्याकरीता |
|---|---|---|
| 1.गट अ पदवी (स्नातक) - वैदयकिय/अभियांत्रिकी/कृषि/पशुसंवर्धन/फीशरीज | द.म.- रु. 190/- | 425/- |
| 2 ाट ब पदवीका वैदयकिय/अभियांत्रिकी/तांत्रिकी/स्थापत्य /बिजनेस मॅनेजमेंड व इतर | द.म.- रु. 190/- | 290/- |
| 3 ाट क प्रमाणपत्र अभ्यासक्रम विज्ञान/अभियांत्रिकी/मेडीसीन प्रमाणपत्र व इतर अभ्यासक्रम | द.म.- रु. 190/- | 290/- |
| 1. गट ड - सर्वसाधारण पदवी पर्यन्त अभ्यासक्रम | द.म.- रु. 120/- | 203/- |
| 2. गट ई - 10 + 2 | द.म.- रु. 90/- | 150/- |

याशिवाय शालांत परिक्षोत्तर अंध विद्यार्थ्यांना - वाचक भत्ता खालील प्रमाणे देण्यात येतो.

गट अ,ब, क्र - वाचक भत्ता रू. 100/-
गट ड - वाचक भत्ता रू. 75 /-
गट इ - वाचक भत्ता रू.50 /-

**अर्ज करण्याची पध्दत :-** अपंग शिष्यवृत्ती प्रस्ताव संबंधीत मु.अ./ प्राचार्य मार्फत 30 सप्टेंबर पुर्वी समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प. चंद्रपुर यांना पाठवावे.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -** (1) मार्कशिट, (2) अपंगांचे वैद्यकिय प्रमाणपत्र जोडावे, अपंग शिष्यवृत्तीकरीता उत्पन्नाची मर्यादा नाही.

**15)अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बिज भांडवल योजना :-**

**उद्देश :-** सुशिक्षीत तथा अशिक्षीत बेरोजगार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी बिजभांडवल योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत अपंग व्यक्तींना स्वत:चा व्यवसाय, धंदा, पुरक उद्योग सुरु करण्यासाठी लागणारे अर्थसहाय्य राष्ट्रीयकृत बॅन्केमार्फत परतफेडीच्या कर्जाच्या स्वरुपात व अनुदानाच्या स्वरुपात भांडवलाची रक्कम समाज कल्याण विभागामार्फत देण्याची योजना आहे.

**लाभार्थी निकष** - (1) लाभार्थीचे 40% चे वर अपंगत्व असावे, (2) त्यांचे वार्षिक उत्पन्न रु. 6,000/- (रु. सहा हजार) चे आंत असावे, (3) वय 18 चे वर व 50 वर्षाचे आंत असावे, (4) व्यवसायाचा अनुभव असावा.

**लाभाचे स्वरूप :-** या योजने अंतर्गत अपंग व्यक्तींना प्रकल्प खर्चाच्या 20% अथवा कमाल रु. 5000/- (पांच हजार रुपये) समाज कल्याण विभागाकडून अनुदान बिज भांडवल स्वरुपात देण्यांत येते. उर्वरीत 80% भाग बॅन्केकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होते. प्रकल्प मर्यादा रु.25,000/- पेक्षा जास्त नसावी.

**अर्ज करण्याची पध्यत :-** प्रस्ताव :- ठराविक नमुण्यात आवेदन पत्रासह आवश्यक कागदपत्रासह जोडुन द्विप्रतीत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा.( अर्जाचा नमुना समाज कल्याण कार्यालयाज विनामुल्य उपलब्ध आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी.**1उत्पन्नाचा दाखला सरंपच, सचिव, तलाठी यांचा 2.वयाचा दाखला, 3.अपंगत्वाचे प्रमाणपत्र, 4.रहीवासी दाखला, 5.धंदयाकरीता साहित्याचे कोटेशन, 6.दोन फोटो (नुकतेच काढलेले), वरील प्रमाणे कागदपत्रासह प्रस्ताव द्वीप्रतीत समाज कल्याण अधिकारी, ( गट-अ) जि.प.चंद्रपूर यांना सादर करावे.

**16)अपंग व्यक्तींना आवश्यकते नुसार कृत्रिम अवयव पुरविणे :-**

**उद्देश :-** या योजने अंतर्गत अपंगांना त्यांचे अपंगत्व सुधारण्यासाठी तसेंच अपंगत्वाची वाढ रोखण्यासाठी व हालचाली सुलभ होण्यासाठी अपंगत्वानुसार निरनिराळी कृत्रिम साधणे अत्यावश्यक असतात. तथापि या साधनांची किंमत सामान्य पालकांना व्यक्तींना त्यांच्या मर्यादीत उत्पन्नातून देता येत नाही. अशा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरजु अपंगांना कृत्रिम साधने उपकरणे उपलब्ध व्हावीत, वयोमानाप्रमाणे ती किंवा आवश्यकते नुसार ती बदलता यावीत, यासाठी राज्य शासनाने कृत्रिम साधने प्रदान करण्याची योजना अंमलात आणली आहे.

**लाभाचे स्वरूप - तिनचाकी सायकल** :- 1.लाभार्थ्यी दोन्ही पायांनी अपंग असलेला व ज्याचे दोन्ही हात सायकल चालविण्यास सक्षम आहेत. अशा लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यांत येईल.

1) **श्रवणयंत्र** :- श्रवण यंत्राकरीता लाभार्थ्याचे वय 5 ते 50 वर्ष पर्यन्त असावे.
2) **अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर** :- 100% अंध तथा 11 वी / 12 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येईल.

**लाभाचे निकष :-** (1) ज्यांचे मासीक उत्पन्न रु.1500/- चे आंत आहे, त्यांना 100% अनुदानावर कृत्रिम अवयव देण्यात येईल. (2) ज्यांचे मासीक उत्पन्न रु.1500/- ते रू. 2000 दरमहा आहे अशा व्यक्तींना 50% अनुदानावर योजनेचा लाभ देण्यात येईल. 50% रक्कम लाभार्थ्यांना नगदी भरावी लागेल. (3) लाभार्थ्यांचे वय 50 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

**अर्ज करण्याची पध्दत -** (1) शाळेतील विद्यार्थ्यांनी विहित प्रपत्रपात अर्ज् शाळेच्या आपले मुख्याध्यापक / प्राचार्य मार्फत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा, इतर अपंग विदयार्थ्यानें परस्पर अर्ज सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी.**

(1) उत्पन्नाचा दाखला,
(2) जन्म तारखेचा दाखला, (3) अपंगत्वाचे 40% चे वरील वैद्यकिय प्रमाणपत्रासह प्रस्ताव

**17)व्यवसाय प्रशिक्षीत अपंगांना व्यवसाय सुरु करण्यास अर्थ सहाय्य :-**

**उद्देश :-** व्यावसायीक प्रशिक्षण पुर्ण केलेल्या अपंगांना स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा,

**लाभार्थी निकष** -लाभार्थी प्रशिक्षित असावा, व 40 टक्के चे वर अंपंगत्व असावे.

**लाभाचे स्वरूप :-** रु. 500/- व रु. 1,000/-

साधन सामुग्रीमध्ये, शिवणकला व्यवसाय, खर्डा तयार करणे, मेनबत्ती बनविणे, केनिंग, आर्मिचर वायंडींग, घड्याळ दुरुस्ती इत्यादी मध्ये कच्चा माल खरेदी करीता आर्थिक मदत दिली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यातील अर्ज समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. ( अर्जाचा नमुना समाज कल्याण विभागात विनामुल्य उपलब्ध आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -** (1) अपंग व्यक्तींना सरकारमान्य संस्थेकडून प्रशिक्षण घेतलेले असावे. (2) त्यांचे वय 18 ते 50 असावे, (3) अपंगत्वाचे 40% चे वर वैद्यकीय प्रमाणपत्र, (4) धंदयासाठी लागणाऱ्या सामानाची यादी किंमतीसह.

**18)अपंगांना ओळखपत्र देणे :-**

**उद्देश :-** अपंगांना कोणत्याही कामाकरीता सरकारी कार्यालयात व खाजगी कार्यालयात गेल्यानंतर कामाचे दृष्टीने अडचण जावु नये याकरीता तथा म.रा.परिवहन महामंडाचे वतीने बस प्रवास करण्यास सवलत मिळावी याकरीता समाज कल्याण विभाग, जि.प.चंद्रपूर कडून ओळखपत्र देण्यात येते.

**लाभार्थी निकष** -1) कुठल्याही प्रवर्गात अपंग व्यक्ती 40 टक्केचे वर अपंग असावा.
2) तो चंद्रपुर जिल्हयाचा रहिवाशी असावा.

**लाभाचे स्वरूप** - म.रा.परिवहन महामंडळाचे वतीने बस प्रवास करण्यास तिकिट दरात सवलत दिली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** - विहित नमुन्यातील अर्ज समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. ( अर्जाचा नमुना समाज कल्याण विभागात विनामुल्य उपलब्ध आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी. :-** (1) चंद्रपूर जिल्हयाचा रहीवासी असावा, (2) जिल्हा शल्य चिकित्सक यांचे 40% चे वरील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे. (2) रहीवासी दाखला, (3) वयाचा दाखला, (4) दोन फोटो (पासपोर्ट साईजचे )

**19)तांडा वस्ती सुधार योजना :-**

**उद्देश :-** महाराष्ट्रात भटक्या जमातीच्या अनेक जाती जमाती अजुनही भटकंती करुन स्थलांतरीत स्वरुपाचे जीवन जगतात. जसे लभान,बंजारा समुहाचे तांडे / वस्त्या असुन अशा तांडयांमध्ये या जमाती अनेक वर्षापासुन राहत असल्या तरी अशा तांडया / वस्त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध होत नाहीत व त्यामध्ये आधुनिकते कडे कल असला तरी बहूसंख्य समाज गरीबीचे जीवन जगत आहे, त्यासाठी तांडे/वस्ती किंवा वस्त्यामध्ये या समाजास स्थिर जीवन जगता यावे, याकरीता सुधारणा होणे आवश्यक आहे, अनुसूचित जातीचे वसाहतीत "दलित वस्ती सुधारणा योजना" 1972 पासुन राबविण्यात येत आहे व या योजनेची फलश्रृती चांगली असल्याचे मुल्यमापणात आढळून आलेले आहे. ही बाब विचारात घेवुन दलित वस्ती सुधारणेच्या योजनेच्या धर्तीवर राज्यातील भटक्या/विमुक्त जातीतील बंजारा ,लभान समुहाचे ( शुध्दीपत्रक दिनांक 1 जुलै 2005) तांडे असलेल्या समाजाच्या सुधारणेसाठी तांडा वस्ती सुधार योजना 7 जुन 2003 चे शासन निर्णयानुसार सुरु करण्यात आली.

**लोकसंख्या निकष व अनुदान :-**

1. 50 ते 100 लोकसंख्या असेलेले तांडे / वस्त्या रु. 2,00,000/-
2. 101 ते 150 लोकसंख्या असेलले तांडे / वस्त्या रु. 3,00,000/-
3. 151 ते अधिक लोकसंख्या असेलेले तांडे / वस्त्या रु. 5,00,000/-

**घ्यावयाची कामे :-** (1) पिण्याचे पाणी, (2) विद्युतीकरणे, (3) अंतर्गत रस्ते, (4) गटारे, (5) शौचालये तसेंच वाचनालय व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याची कामे करता येतील.

**अर्ज करण्याची पध्दत** - विहित नमुन्यातील अर्ज संवर्ग विकास अधिकारी मार्फत समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेडे सादर करावा.( अर्जाचा नमुना पं.स. स्तरावरून घेण्यांत यावा.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी** :- ग्राम पंचायतीने प्रस्तावासोबत - (1) नमुण्यातील आवेदनपत्र, (2) ग्रा.पं.ठराव व ग्रामसभा ठराव, (3) मंजुर केलेल्या अनुदानापेक्षा अंदाज पत्रकानुसार जादा होणारा खर्च ग्रा.पं. करण्यास तयार असल्याबाबत ठराव, (4) ग्रा.पं.मालकीचा 7/12 चा उतारा, (5)

जागेचा नकाशा उपअभियंता यांनी प्रमाणीत केलेला, (6) यापुर्वी अनुदान घेतले नसल्याबाबत ग्रा.पं.दाखला, (7) अंदाजपत्रक, (8) लोकसंख्ये बाबत प्रमाणपत्र

वरील प्रमाणे प्रस्ताव 4 प्रतीत संबंधीत संवर्ग विकास अधिकारी यांचे मार्फत समाज कल्याण अधिकारी, जि.प.चंद्रपूर यांचेकडे सादर करावा.

## 20) वृध्दाश्रमांना राज्य शासनाचे अनुदान

**उददेश -** प्रत्येक जिल्हयात एक वृध्दाश्रम त्यामध्ये निवासाचे सोयी शिवाय बाग-बगीचा,वाचनालय, दुरदर्शन, बैठे, खेळ इत्यादी सोयींचा समावेश असेल अशा प्रकारचा सुसज्य वृध्दाश्रम स्वयंसेवी संस्थेमार्फत सुरू करणे.

**लाभार्थी निकष -** वयाची 60 वर्षे पुर्ण झालेले निराधार व निराश्रीत वृध्द पुरूष व 55 वर्ष वयाच्या निराधार निराश्रीत स्त्रीया तसेच प्रौढ अपंग यांना प्रवेश देण्यांत येतो.तसेच वृध्दांचे स्वत:चे वार्षिक उत्पन्न रू. 12000/- चे वर आहे. त्यांचेकडून रू. 500/- पर्यंत दरमहा शुल्क आकारण्यांत येईल. त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या वृध्दांन कडून कोणतेही शुल्क आकारण्यांत येणार नाही.

**लाभाचे स्वरूप -** भोजन ,निवास, बाग-बगीचा,वाचनालय, दुरदर्शन, बैठे, खेळ इत्यादी सोयी उपलब्ध करून देण्यांत येतात.

**अर्ज करण्याची पध्दत -** सबंधित वृध्दाश्रमात विहित नमुन्यात अर्ज सादर करणे.

**अर्जासोबतखालील कागदपत्रे जोडावी -**

1. वयाचा पुरावा.2 सक्षम अधिका-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे.

**चंद्रपुर जिल्हयातील कार्यरत वृध्दाश्रम**

1) मातोश्री वृध्दाश्रम - भिवकुंड नाला , विसापुर ,ता.बल्लारपुर
2) मातोश्री वृध्दाश्रम - भिसी ,ता.चिमुर

## 21 ) मागास वर्गीयांच्या घरावरील गवती छप्परे बदलुन मंगलोरी कौले अथवा टीनपत्रे घालणे.

**उददेश -** ग्रामिण भागातील विजाभज, अनुसुचित जमाती प्रवर्गातील दारिद्र रेषेखालील लोकांच्या घरावरील गवती छप्पर बदलुन त्या जागी मंगलोरी कौले अथवा टीनपत्रे देवुन त्यांना पक्या निवारा उपलब्ध करूण देणे.

**लाभार्थी निकष -** पात्र लाभार्थीचे घरावर गवती छप्पर असणे आवश्यक असुन तो दारिद्र रेषेखालील असावा. नसल्यास उत्पन्न दाखला रू.20000/- चे आतील तहसीलदार यांचा व जातीचा दाखला जोडाणे आवश्यक आहे. लाभार्थी हा विजाभज प्रवर्गाचा असावा.त्यांचे स्वत:चे मालकिचे घर असावे.

**लाभाचे स्वरूप -** रू. 4000/- चे मर्यादेत वस्तुरूपात 100 टक्के अनुदान दिले जाते.

**अर्ज करण्याची पध्दत -** लाभार्थ्याने विहित नमुन्यातील अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -**

1. दारिद्र रेषेचे प्रमाणपत्र व दारिद्र रेषेत नसल्यास उत्पन्न दाखला रू.20000/- चे आतील तहसीलदार यांचा व जातीचा दाखला जोडाणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय सम विकास योजना

**<u>अपंगांना अल्पमुदती प्रशिक्षण योजना</u>**

**उददेश -** वर्ग 7 वा पास असणा-या अपंग व्यक्तींना व्यावसायिक प्रशिक्षण देवुन स्वयंपुर्ण करणे.

**लाभार्थी निकष -** अपंग व्यक्ती वर्ग 7 वा पास असावा. अपंगत्व 40 टक्के चे वर असावे. तसेच हातांनी बळकट असावा.

**लाभाचे स्वरूप** - खालील प्रमाणे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यांत येईल.

3) स्त्रियांचे व पुरूषाचे कपडे शिवणे 2) घरगुती उपकरणे दुरूस्ती 3) वायरमन ( घरगुती वायरिंग व रिवाईडींग 4) आर्क व गॅस वेल्डींग 5) जनरल व फिटर व ॲल्युमिनिअम स्लायडींग 6) रेडिओ, टिव्ही, मोबाईल दुरूस्ती 10 पास उमेदवारांकरीता 7) संगणक, डीटीपी, पेज सेटिंग, एन्ट्री ऑपरेटर.6 महिने अभ्यासक्रमाचे व्यावसायिक प्रशिक्षण औदयोगिक प्रशिक्षण संस्था चंद्रपुर येथे सुरू आहे.

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यातील अर्ज समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. ( अर्जाचा नमुना समाज कल्याण विभागात विनामुल्य उपलब्ध आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी.**

1) अपगंत्वाचे प्रमाणपत्र
2) शैक्षणिक प्रमाणपत्र

## 20 संकिर्ण जिल्हा निधी ( समाज कल्याण विभाग)

**1) अपंग जोडप्यांचा सत्कार**

**उददेश** - अपंग उमेदवारांना सामाजिक दर्जा प्राप्त व्हावा व त्यांचे सामाजिक पुनवर्सन साधले जावे याकरीता एप्रिल 2007 पासून पुढे विवाह करणा-या ग्रामिण पातळीवरील अपंगांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना सुरू करण्यांत येत आहे.

**लाभाचे स्वरूप-** वर-वधु दोन्ही अपंग ( किमान 40 टक्के) असल्यास रू. 15,000/- चे आर्थिक सहाय्य ज्यामध्ये रू. 7500/5 चा धनादेश व रू. 7500/- अल्पबचत प्रमाणपत्र देण्यांत येईल.वर-वधु पैकी फक्त एक अपंग (किमान 40 टक्के) असल्यास आर्थिक सहाय्य रू. 10,000/- ज्यामध्ये रू. 5000/- चे अल्पबचत प्रमाणपत्र व 5000 रू. धनादेश देण्यांत येईल.

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यातील अर्ज समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. ( अर्ज समाज कल्याण विभागात उपलब्ध आहे.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

1) दिनांक 1/4/07 व नंतर विवाह करणारे अपंग जोडपे हे ग्रामिण भागातील चंद्रपुर जिल्हयातील स्थानिक रहिवाशी असावेत.याकरीता ग्रामपचायत सचिव यांचा दाखला जोडावा.
2) अपंग व्यक्तींचे अपंगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्क्असावे.अपंगत्वाचे वैदयकिय प्रमाणपत्र जोडावे
3) लग्नाचे वेळी वराचे वय किमान 21 वर्षे व वधुचे वय 18 वर्षे असावे.वयाचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.
4) लग्नाबाबत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे ( रजिष्ट्रार किंवा ग्रामपंचायत दाखला)

**2 )व्यवसाय प्रशिक्षीत अपंगांना व्यवसाय सुरु करण्यास पुरक अर्थ सहाय्य :-**

**उद्देश :-** व्यवसाय प्रशिक्षित अपंगाना व्यवसाय सुरू करण्यास अर्थसाहय्य राज्य शासनाच्या अपंग कल्याण विभागाकडून रू. 1000/- च्या मर्यादेत देण्यांत येते.परंतू यामध्ये काही व्यवसायाकरीता लागणारे साहित्य रू. 1000/- पेक्षा जास्त किंमतीचे असल्याने दुराव्याची रक्कम भरणे ब-याच वेळेला प्रशिक्षित अपंगांना शक्य होत नाही, याकरीता संबंधित व्यवसायाकरीता लागणारे आवश्यक साहित्य खरेदीकरीता रू. 1000/- वरील दुराव्याची रक्कम लाभार्थ्याला उपलब्ध करून देणे.

**लाभार्थी निकष -**लाभार्थी प्रशिक्षित असावा, व 40 टक्के चे वर अंपंगत्व असावे.

**लाभाचे स्वरूप :-** रु. 2000 चे मयादेत वस्तुरूपात.
( साधन सामुग्रीमध्ये, शिवणकला व्यवसाय, खर्डा तयार करणे, मेनबत्ती बनविणे, केनिंग, आर्मिचर वायंडींग, घड्याळ दुरुस्ती इत्यादी मध्ये कच्चा माल खरेदी करीता आर्थिक मदत दिली जाते.)

**अर्ज करण्याची पध्दत -** विहित नमुन्यातील अर्ज समाज कल्याण अधिकारी (गट-अ) जि.प.चंद्रपुर यांचेकडे सादर करावा. ( अर्जाचा नमुना समाज कल्याण विभागात विनामुल्य उपलब्ध

आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी -** (1) अपंग व्यक्तींना सरकारमान्य संस्थेकडून प्रशिक्षण घेतलेले असावे. (2) त्यांचे वय 18 ते 50 असावे, (3) अपंगत्वाचे 40% चे वर वैद्यकीय प्रमाणपत्र, (4) धंदयासाठी लागणाऱ्या सामानाची यादी किंमतीसह.

**<u>जिल्हा परिषद योजना :- 20% सेस फंड योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना</u>**

**( खाली नमुद सर्व योजनात लाभार्थीचे नांव ग्राामसभा ठरावात असणे आवश्यक आहे.तसेच नियम व अटी मध्ये नमुद सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.)**

**1) मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन पुरविणे.**
**( 20 टक्के सेसफंड अनुदान योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना)**

**उद्देश :-** मागासवर्गीय महिलांचा सामाजीक दर्जा सुधारणे व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देवुन आर्थीक दर्जा उंचाविणे .

**लाभार्थी निकाष -**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज ची असावी.
2) 7 टक्के वन महसुल अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी वन गावातील असावी.
3) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.
4) 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत लाभार्थी दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार यांचा दाखला जोडावा.
5) लाभार्थी साक्षर असावी. कमीत कमी 4 था पास पास असल्याबाबत प्रमाणपत्र जोडावे. शिवनकला शिकल्याचे प्रमाणपत्र जो डावे.
6) लाभार्थ्याचे वय 18 ते 50 वर्ष दरम्यान असावे.( प्रमाणपत्र जोडावे)
7) लाभार्थी विवाहित असल्यास तहसीलदार यांचे शपथपत्र जोडावे ( ॲफीडेव्हिट)
8) लाभार्थी विधवा असल्यास पतीचा मृत्युचा दाखला अर्जासोबत जोडावा.
9) घटस्फोटित असल्यास घटस्फोट घेतल्याबाबत कोर्टाचा दाखला जोंडावा. तसेच तहसीलदार यांचे ॲफिडेव्हिट करून सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.
10) निराधार असल्यास त्या सबंधिचा पुरावा जोडावा.
11) शिलाई मशिन मंजूर झाल्यास करारनामा लिहुन दयावा लागेल.
12) शिलाई मशिन नेण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील. तसेच त्या सबंधी इतर खर्च कार्यालयाकडून मिळणार नाही.
13) लाभार्थ्यास इतर योजनेतुन शिलाई मशिन लाभ मिळाला नसल्याचे लेखी लिहुन दयावे लागेल.
14) लाभार्थ्यास शिलाई मशिन 100 टक्के अनुदानावर देण्यांत येत आहे.

15) योजनेचा लाभ घेतांना दिलेला लाभ इतरांना विकता येणार नाही.विकल्यास संपुर्ण रक्कम एकमुस्त वसुल करण्यांत येईल.व कयदेशिर कारवाईस पात्र राहील.

16) अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.

17) अर्जदाराचे नांव ग्रामसभा ठरावात असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप** - 100 अनुदानावर वस्तुरूपात कपडें शिलाई मशिन पुरविली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** - पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी**

1. शैक्षणिक प्रमाणपत्र
2. शिवनकला शिकल्याचे प्रमाणपत्र
3. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र 7 टक्के वन महसुल अंतर्गत फक्त उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे जातीच प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यता नाही.
4. विवाहित असल्यास शपथपत्र तहसीलदार यांचे सहिचे शपथपत्र जोडावे.

**2) मागावर्गीय मुलांना हलके वाहन चालक प्रशिक्षण :- ( 20 टक्के सेसफंड अनुदान योजना)**

**उद्देश** :- मागासवर्गीय मुलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.

**लाभार्थी निकष**

1) उमेदवार हा पुरूष असावा.

2) अर्जदार ग्रामिण भ ागातील अजा,अज,विजाभज प्रवर्गाचा असावा.

3) लाभार्थी दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधि कारी (महसुल) /तहसीलदार यांचा जातीचा दाखला जोडावा.

4) जिल्हा परिषदेने ठरवुन दिलेल्या संस्थेत 35 दिवस प्रशिक्षण घ्यावे लागेल.

5) प्रशिक्षण /राहण्याचा/जेवणाचा खर्च जि.प.कडून करण्यांत येईल.

6) प्रशिक्षणासाठी येण्याचा व प्रशिक्षण संपल्यावर जाण्याचा खर्च देण्यांत येणार नाही. तसेच विदयावेतन देय नाही.

7) प्रशिक्षण काळात प्रशिक्षण कार्यालयात काही कमी जास्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार न ाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत वर्तणुक चांगली असावी. अन्यथा काढुन टाकण्यांत येईल.

8) अर्जदाराचे वय 18 वर्षाहुन कमी व 35 वर्षाहुन जास्त नसावे.

9) शैक्षणिक पात्रता 4 था पास असावी. ( प्रमाणपत्र जोडावे)

10)अर्जदाराचे नांव ग्रामसभा ठरावात असणे आवश्यक आहे.

**प्रशिक्षण देण्या-या संस्थेत रूजु होतेवळी खालील प्रमाणपत्रे दयावे लागेल.**

(अ) शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्य प्रत)
(ब) 7 पासपोर्ट आकाराचे फोटो
(क) रविवाशी बाबत पुरावा.

**लाभाचे स्वरूप -** 100 टक्के अनुदानावर 35 दिवसाचे प्रशिक्षण दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** – पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**

1. शैक्षणिक पुरावा.
2. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र.

### 3) 8वी ते 10वी मध्ये शिकणाऱ्या मा.व.मुलींना लेडिज सायकल पुरविणे :- ( 20 टक्के सेसफंड अनुदान योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना)

**उद्देश :-** मागासवर्गीय व इतर प्रवर्गातील मुलीं/मुलांना शाळेत येण्या-जाण्यास मदत.

**लाभार्थी निकष**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज ची असावी.
2) 7 टक्के वन महसुल अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी वन गावातील असावा.
3) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.
4) 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत लाभार्थी दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार यांचा दाखला जोडावा.
5) अर्जदार शिकत असल्याबाबत व गाव ते शाळा अंतर 3 किमी चे वर असल्याबाबत मुख्याध्यापकाचे प्रमापणपत्र जोडावे.
6) यापुर्वि योजनेचा लाभ घेतला नाही याबाबत लेखी निवेदन लिहुन दयावे लागेल.
7) अर्जदार दोन्ही हातांनी बळकट असावा.
8) विदयार्थी वसतीगृहात राहत असल्यास लाभ देता येणार नाही.
9) अर्जदार निराधार आई वडील नसलेला असल्यास प्राधान्य देण्यांत येईल.
10) अर्जदाराचे मागील वर्षीचे गुण 40 टक्के चे वर असणे आवश्यक आहे.
11) अर्जदार वर्ग 8 ते 10 मध्ये शिकत असणारा असावा.
10) स्वतःचे गावी माध्यमिक विदयालय असल्यास सदर लाभ देय असणार नाही.
11) अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.
12) अर्जदाराचे नांव ग्रामसभेच्या ठरावात असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप -** 100 टक्के अनुदान तत्वावर वस्तुरूपात साइकल उपलब्ध करून दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**

3. मागील वर्षी उतीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिका.
4. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र.7 टक्के वन अनुदान अंतर्गत उत्पन्न दाखला जोडण्याची आवश्यता नाही.

**4) ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना 90टक्के अनुदानावर लोखंडी बंडी पुरविणे :-**
**( 20 टक्के सेसफंड अनुदान योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना)**

**उद्देश :-** शेतीचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करणे.

**लाभार्थी निकष -**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज चा असावा.

2) 7 टक्के वन महसुल अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी वन गावातील असावा.

3) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.

4) 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत लाभार्थी दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार यांचा दाखला जोडावा.

5) लाभार्थ्याकडे वैयक्तीक किंवा सामायिक 0.40 ते 2.00 हे. पर्यंत जमीन असावी. ज्यांची जमीन नमुना 8-अ मध्ये 5 एकराचे वर असेल व हिस्सेदार जास्त असेल व अर्ज करणा-या लाभार्थ्याचे नावे जमीन 5 एकराचे आंत येत असेल तरीही सुध्दा योजनेचा लाभ घेता येणार नाही. 5 एकरा पावेतो शेतीत हिस्सेदार असल्यास रू. 20 स्टम्पपेपर वर समंतीपत्र आवश्यक आहे.

6) शेतक-यांकडे बैलजोडी असणे आवश्यक आहे.

7) शेतक-याने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ या अगोदर घेतला असल्यास सदर योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

8) शेतक-यास 10 टक्के रक्कम जिल्हा निधित भरणा करावी लागेल.

9) अर्जासोबत करारनामा लिहुन दयावा लागेल लोखंडी बंडी विकल्याचे/गहाण ठेवल्याचे निदर्शनास आल्यास लोखंडी बंडीची संपुर्ण रक्कम सबंधिताकडून एकमुस्त वसुल करण्यांत येईल. व कायदेशिर कारवाईस पात्र राहील.

10) शेतक-याचे नांव ग्रामसभा ठरावात असणे अ ावयश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप -** 90 टक्के अनुदान तत्वावर लोखंडी बंडी उपलब्ध करून दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** — पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**

1. सात/बारा, नमुना 8 अ, व 5 एकर जमीनीत हिस्सेदार असल्यास हिस्सेदाराचे संमतीपत्र.
2. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र, 7 टक्के वन अनुदान अंतर्गत उत्पन्न दाखला जोडण्याची आवश्यता नाही.

**5) मागासवर्गीय मुला/मुलींना संगणकाचे प्रशिक्षण देणे :-**
**(20 टक्के सेसफंड अनुदान योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना)**

**उद्देश :-** मुला/मुलींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.

**लाभार्थी निकष :-**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज चा असावा.
2) 7 टक्के वन महसुल अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी वन गावातील असावा.
3) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.
4) 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत लाभार्थी दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार यांचा दाखला जोडावा.
5) अर्जदाराचे शिक्षण कमीत कमी वर्ग 10 वा पास व 45 टक्के पेक्षा गुण कमी नसावे.
6) अर्जदार सुशिक्षित बेरोजगार असावा. ग्रामसेवक यांचे कडून प्रमाणपत्र जोडावे.
7) प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर होणा-या परिक्षेस विदयार्थी उतीर्ण होणे आवश्यक आहे.
8) प्रशिक्षणास येतांना किंवा प्रशिक्षण संपल्यावर जातांना जाण्या येण्याचा खर्च मिळणार नाही. तसेच विदयावेतन देय नाही.
9) प्रशिक्षण कालावधी 90 दिवस किंवा 180 दिवस असेल.
10) प्रशिक्षण कालावधीत काही कमी जास्त झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशिक्षणार्थ्यांची राहील.
11) अर्जदाराचे वय 18 ते 35 वर्ष दरम्यान असावे.
12)अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.
13) अर्जदाराचे नांव ग्रामसभेच्या ठरावात असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप** - 100 टक्के अनुदान तत्वावर 90 दिवसाचे संगणक प्रशिक्षण दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** — पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**

1. शैक्षणिक प्रमाणपत्र
2. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
3. 20 /- स्टॅम्पपेपरवर करारनामा.
4.दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र, 7 टक्के वन अनुदान अंतर्गत उत्पन्न दाखला जोडण्याची आवश्यता नाही.

**6) मागासवर्गीयांना शेतीकरीता पी.व्ही.सी. पाईप पुरविणे :-**
**( 20 टके जिल्हा परिषद सेसफंड अनुदान योजना )**
**उद्देश :-** मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेती करीता मदत करणे.

**लाभार्थी निकष**
.1) अर्जदार ग्रामिण भ ागातील अजा,अज,विजाभज प्रवर्गाचा असावा.
2) लाभार्थी दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधि कारी (महसुल) /तहसीलदार यांचा जातीचा दाखला जोडावा.
3) लाभार्थ्याकडे वैयक्तीक किंवा सामायिक 0.40 ते 2.00 हे. पर्यंत जमीन असावी. ज्यांची जमीन नमुना 8-अ मध्ये 5 एकराचे वर असेल व हिस्सेदार जास्त असेल व अर्ज करणा-या लाभार्थ्याचे नावे जमीन 5 एकराचे आंत येत असेल तरीही सुध्दा योजनेचा लाभ घेता येणार नाही. 5 एकरा पावेतो शेतीत हिस्सेदार असल्यास रू. 20 स्टम्पपेपर वर समंतीपत्र आवश्य आहे.
4) जमीनीला लागुन नाला किंवा शेतात विहिर असावी, त्याकरीता पटवा-याचे प्रमाणपत्र व शेतीचा नकाशा जोडावा.
5) लाभार्थ्याजवळ इंजिन किंवा इले.मोटरपंप असावा.
6) योजनेचा लाभ घेतांना सदर लाभाची वस्तु विकता येणार नाही. याबाबत 20 रू. स्टम्पपेपर वर हमीपत्र लिहुन दयावे लागेल.
7) लाभार्थीस 75 टक्के अनुदान दिल्या जाते. व 25 टक्के रक्कम लाभार्थ्यास नगदी भरावी लागेल.
8) )अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.
9) अर्जदाराचे नांव ग्रामसभेच्या ठरावात असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप -** 75 टक्के अनुदानावर पि.व्ही.सी पाईप उपलब्ध करून दिल्या जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** — पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**
1. सात/बारा, नमुना 8 अ, व 5 एकर जमीनीत हिस्सेदार असल्यास हिस्सेदाराचे संमतीपत्र.
2. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र.

**7) अनुदानावर बॅन्ड संच/संदल संच व इतर वाद्य साहित्य पुरविणे :-**
**(20 टक्के सेसफंड अनुदान योजना)**

**उद्देश :-** ग्रामिण भागातील लाभार्थीस स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

**लाभार्थी निकष**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज चा असावा.

2) ) 20 टक्क्े सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.

3) लाभार्थ्याचे वय 18 ते 50 वर्ष दरम्यान असावे.प्रमाणपत्र जोडावे.

4) रू. 7000/- प्रकल्प किंमतीचे मर्यादेत साहित्य पुरविण्यांत येईल.

5) लाभार्थ्यांस 10 टक्के रक्कम जिल्हा निधित भरणा करावी लागेल.

6) योजनेचा लाभ घेतांना सदर लाभ इतरांना विकणार नाही. विकल्यास व गहाण ठेवल्यास रक्कम एकमुस्त वसुल करण्यांत येईल. याबाबत करारनामा लिहुन दयावा लागेल.

7) लाभार्थ्यानी त्यापैकी एकाचे गटप्रमुख म्हणुन 20 रू. स्टॅम्पेपर वर नाव घोषित करावे.

8) लाभार्थ्याचा गट 5 त 7 व्यक्ती मिळुन तयार केलेला असावा.

9)अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.

10) अर्जदाराचे नांव ग्रामसभा ठरावात असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप** -90 टक्के सुटिवर बॅण्डसंच/संदलसंच वस्तुरूपात पुरविली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत** - पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी**

1 वयाबाबत प्रमाणपत्र सर्व सभासदांचे
2. करारनामा व 20 रू.स्टॅम्पेपर वर घोषणापत्र.
3दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र .

**8) शेतक-यांना कुंपना करीता काटेरी तार वाटप :-**
**(20 टक्के सेसफंड अनुदान योजना व 7 टक्के वन महसुल अनुदान योजना)**

**उद्देश :-**शेतकऱ्यांचे पिकांचे वन्य प्राण्यांपासुन संरक्षण करण्याचे दृष्टीने ही योजना राबविली जाते.

**लाभार्थी निकष**

1) 20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनु.जाती, अनु.जमाती,

विजाभज चा असावा.

2) 7 टक्के वन महसुल अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी  वन गावातील असावा.

3)  20 टक्के सेसफंड अनुदान योजने अंतर्गत लाभार्थी हा दारिद्र रेषेखालील असावा जर दारिद्र रेषेत नसल्यास 20,000/- रू. उत्पन्नाचा तहसीलदार यांचा व उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचा जातीचा दाखला जोडावा.

4) 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत लाभार्थी दारिद्र रेषेत नसल्यास रू. 20000/- वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार यांचा दाखला जोडावा.

5) लाभार्थ्याकडे वैयक्तीक किंवा सामायिक 0.40 ते 2.00 हे. पर्यंत जमीन असावी. ज्यांची जमीन नमुना 8-अ मध्ये 5 एकराचे वर असेल व हिस्सेदार जास्त असेल व अर्ज करणा-या लाभार्थ्याचे नावे जमीन 5 एकराचे आंत येत असेल तरीही सुध्दा योजनेचा लाभ घेता येणार नाही. 5 एकरा पावेतो शेतीत हिस्सेदार असल्यास रू. 20 स्टम्पपेपर वर समंतीपत्र आवश्य आहे.

6) शेतक-याने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ या अगोदर घेतला असल्यास सदर योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

7) शेतक-यास 10 टक्के रक्कम जिल्हा निधित भरणा करावी लागेल.

8) अर्जासोबत करारनामा लिहुन दयावा लागेल काटेरी तार  विकल्याचे/गहाण ठेवल्याचे निदर्शनास आल्यास काटेरी तारेची  संपुर्ण रक्कम सबंधिताकडून एकमुस्त वसुल करण्यांत येईल. व कायदेशिर कारवाईस पात्र राहील.

9)अर्जदाराने किंवा कुंटुंबियांनी या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभ देय असणार नाही.

10) शेतक-याचे नांव ग्रामसभा ठरावात असणे अ ावयश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप -** 90 टक्के अनुदानावर काटेरी तारेचा वाटप करण्यांत येते.

**अर्ज करण्याची पध्दत -**  पात्र लाभार्थीने अर्ज ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी .**

1  सात/बारा, नमुना 8 अ, व 5 एकर जमीनीत हिस्सेदार असल्यास हिस्सेदाराचे संमतीपत्र.

2. दारिद्र रेषेत नसल्यास जातीचे व उत्पनाचे प्रमाणपत्र, 7 टक्के वन अनुदान अंतर्गत उत्पन्न दाखला जोडण्याची आवश्यता नाही.

## <u>अपंग  व्यक्तींचे ओळखपत्रासाठी करावयाचा अर्ज</u>

1 अपंग व्यक्तीचे पूर्ण नांव-----------------------------------------------------
2 जन्म तारीख अथवा वय---------------------------------------------------------
3 अपंगत्वाचा प्रकार व प्रमाण---------------------------------------------------
4 व्यवसाय------------------------------------------------------------------
5 पुर्ण पत्ता----------------------------------------------------------------
6 जन्म खुण/ओळख खूण------------------------------------------------------
7 शिक्षण/प्रशिक्षण------------------------------------------------------------

स्थळ-----------------------
दिनांक ---------------------

अर्जदाराची सही

**अर्जासोबत सादर करावयाचे दाखले**

1 जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह दाखला
2 वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला.
3 रहिवाशीचा द ाखला ( सरपंचाचा ) किंवा राशन कार्डाची झेरॉक्स प्रत.
4 पासपोर्ट आकाराचा फोटो - 2 नग

टिप - एका अपंग व्यक्तीस फक्त एकाच जिल्हयात ओळखपत्रासाठी अर्ज करता येईल.

**20 टक्के जिल्हा परिषद,सेसफंड अनुदान 7 टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत वैयक्तींक लाभ योजना करीता करावयाचा सर्वसाधारण नमुना**

**टिप - योजनानिहाय अर्जाचे नमुने पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून देण्यांत आलेले आहे.**

**प्रती,**

**समाज कल्याण अधिकारी (गट-अ)**

**जिल्हा परिषद,चंद्रपुर**

मार्फत - संवर्ग विकास अधिकारी---------------------पंचायत समिती

विषय - 90 टक्के अनुदानावर ग्रामिण शेतक-यांना लोखंडी बंडीचा पुरवठा करणे.

1 लाभार्थीचे पूर्ण नांव----------------------------------------------------------
2 पूर्ण पत्ता-------------------------------------------------------------------
3 लाभार्थ्यांचे वय---------------------------------------------------------------
4 जमीनीचे क्षेत्रफळ ( 1 ते 5 एकर पोवतो 7/12, 8 अ जोडावा)----------------
5 बैलजोडी आहे काय-असल्यास दाखला जोडावा---------------------------------
6 दारिद्र रेषा क्रमांक ---------------------ग्रामसभा ठराव क्रमांक ------------उत्पन्न ------दि-
7 लाभार्थी हिस्सा भरण्यास तयार आहे काय .
8 यापुर्वी इतर योजनांचा लाभ घेतला आहे काय.
9 व्यवसायाचा अनुभव आहे काय. तसे प्रमाणपत्र जोडावे लागेल.

सदर योजनेसाठी मी अर्ज प्रथमतः करीत असुन समाज कल्याण समितीने ठरवुन दिलेल्या नियम व अटी मला मान्य आहे

दिनांक अर्जदाराची सही/आंगठा

**करारनामा**

मी------------------------------------------ याद्वारे करारनामा लिहुन देतो की, अर्जासोबत जोडलेली माहिती सत्य असुन मिळालेली वस्तु मी माझ्याकरीता वापर करीन गैरवापर करणार नाही. असे झाल्यास सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

अर्जदाराची सही/आंगठ

## रहिवाशी व पटवा-याचे प्रमाणपत्र

श्री/श्रीमती------------------------------------------मौजा------------------------गावाचा - --------------वर्षापासुन रहिवाशी असून त्याची जात-----------------आहे. त्यांचा खाते क्रमांक ---------- असुन 7/12 व गांव नमुना आठ प्रमाणे त्यांचे कुंटुबांत एकूण ---------------हेक्टर/आर जमीन आहे. त्यांचकडे बैलजोडी आहे / नाही.

ग्रामसेवक<br>सही/शिक्का

पटवारी<br>सही/ शिक्का

---

## विस्तार अधिकारी व ग्राम सचिवाचा दाखला

कुंटुंबप्रमुख श्री-----------------------------------------------हे दारिद्र रेषेखालील असुन त्यांचा दा.रे.क्र--------------------------नविन जनगणनेनुसार आहे. व वार्षिक उत्नन्न --------------आहे. त्यांची जात---------------ही आहे. ग्रामसभा ठराव क्रमांक----------------------दिनंक--------------- आहे. अर्जदाराने यापुर्वी सदर योजनेचा वा इतर योजनेचा लाभ घेतलेला नसुन अर्जासोबत लागणारी सर्व कागदपत्रे जोडलेली असुन अर्जासोबज जोडलेली सर्व माहिती सत्य आहे. सबब प्रमाणित करण्यांत येत आहे.

सचिव<br>सही व शिक्का

विस्तार अधिकारी<br>सही व शिक्का

---

## संवर्ग विकास अधिकारी यांची शिफारस

योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अटीची पुर्तताा अर्जदाराने केलेली असुन, अर्जदार गरजु व पात्र असल्यामुळे व यापुर्वी कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसल्याने त्यांचा अर्ज मंजुर करून लाभ देण्यांत शिफारस करण्यांत येत आहे.

संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती---------

---------------------------------------------------------------------------------------------

- स्वा-

**समाज कल्याण अधिकारी (गट-अ),**<br>**जिल्हा परिषद, चंद्रपूर**